सीएनआर नं.:एमएचएमएम१७००७९०४२०२४

| | | |
|---|---|---|
| **खटला नोंदणी दिनांक** | : | **२५.०४.२०२४** |
| **निकाल दिल्याचा दिनांक** | : | **१६.०७.२०२५** |
| **कालावधी** | : | **०१ ०२ २१**<br>**वर्ष महिने दिवस** |
| **निशाणी क्रमांक** | : | **<u>५</u>** |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे १७वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.</u>**
**<u>(पिठासीन अधिकारी ए. एम. मुजावर)</u>**
**<u>(न्यायनिर्णय फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५५ प्रमाणे)</u>**

| | | |
|---|---|---|
| **१. खटल्याचा अनुक्रमांक** | : | **<u>३२३०/पीएस/२०२४</u>** |
| **२. अपराध घडल्याचा दिनांक** | : | २४.१२.२०२३ |
| **३. फिर्यादीचे नाव** | : | महाराष्ट्र राज्य,<br>द्वारा— वनराई पोलिस ठाणे<br>(वर्दीदार—लक्ष्मण जनार्दन काप याचे वर्दीवरुन)<br>गुन्हा क्रमांक ४४०/२०२३ |
| **४. आरोपीचे नाव, पालकत्व व रहाण्याचे ठिकाण** | : | ब्रिजेश रामदास चौधरी<br>वय : २४ वर्षे<br>रहाणार: ई/१०३, हरकेंश, राजमंदिर कॉम्प्लेक्स, मिरा भाईंदर रोड, ठाणे. |
| **५. तक्रारीचे किंवा अपराध सिद्ध झाल्याचे कलम** | : | भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८. |
| **६. आरोपीचे कथन व त्याची तपासणी** | : | आरोपीने गुन्हा नाकबूल केला. |
| **७. अंतिम आदेश** | : | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |
| **८. आदेशाचा दिनांक** | : | **१६.०७.२०२५** |

Digitally signed by AMJADKHAN MEHABOOB MUJAWAR
Date: 2025.07.16 14:57:56 +0530

**अभियोग पक्षातर्फे** : सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. हेमंत पगारे
**आरोपीतर्फे** : विधीज्ञ श्री. कौसर खान

**न्या य नि र्ण य**
**(दिनांक १६.०७.२०२५ रोजी पारीत)**

१. आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :**

२. दिनांक २४.१२.२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता २७१, बिझनेस पार्क, मेन गेटसमोर, विष्वेष्वर नगर, विरवाणी इस्टेट, गोरेगाव (पूर्व) येथे वर्दीदार त्याच्या ऑफीसमध्ये जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना, आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच–०४–जेडब्ल्यू–९५३० निष्काळजीपणे व हयगयीने ने भरधाव वेगात येवून वर्दीदाराला धडक दिली व त्याला अस्थिभंग दुखापत करण्यास कारणीभुत ठरला. म्हणून वर्दीदाराने वनराई पोलिस स्टेशनला खबर दिली.

३. या तक्रारीवरुन अपराध क्रमांक ४४०/२०२३ नोंदविण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीला अटक केली व प्रकरणाचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुद्‌ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

४. आरोपीविरुद्‌ध भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ दोषारोप निश्चित करण्यात आले. दोषारोप पत्रातील मजकूर आरोपीला समजावून सांगितला असता, त्याने गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन प्रकरण पुढे चालवण्याची विनंती केली.

५. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

Digitally signed by AMJADKHAN MEHABOOB MUJAWAR Date: 2025.07.16 14:58:01 +0530

६. प्रस्तुतकामी अभिलेखावरील कागदपत्रे आणि आलेला पुरावा यावरुन पुढील मुद्दे विचारार्थ निर्माण झाले. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणांसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय की, दिनांक २४.१२.२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता २७१, बिझनेस पार्क, मेन गेटसमोर, विष्वेष्वर नगर, विरवाणी इस्टेट, गोरेगाव (पूर्व) येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र. एमएच—०४—जेडब्ल्यू—९५३० सार्वजनिक रस्त्यावर इतरांचे जिवितास धोका उत्पन्न होईल अशाप्रकारे निष्काळजीपणे अगर हयगयीने चालवले आणि त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये गुन्हा केला ? | : | नाही |
| २. | अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाण येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच—०४—जेडब्ल्यू—९५३० भरधाव वेगाने व हयगयीने चालवून वर्दीदाराला धडक देवून दुखापत केली आणि त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ३३७ अन्वये गुन्हा केला ? | : | नाही |
| ३. | अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाण येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच—०४—जेडब्ल्यू—९५३० भरधाव | : | नाही |

Digitally signed by AMJADKHAN MEHABOOB MUJAWAR
Date: 2025.07.16 14:58:06 +0530

| | | | |
|---|---|---|---|
| | वेगाने व हयगयीने चालवून वर्दीदाराला धडक दिली व त्याच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत केली आणि त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ३३८ अन्वये गुन्हा केला ? | | |
| ४. | आदेश काय? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

७. आरोपीवर लावण्यात आलेले आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ वर्दीदार—लक्ष्मण काम (सा.क्र.१) याची साक्ष निशाणी—३ वर नोंदविली. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता हेमंत पगारे आणि आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. कौसर खान यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता :</u>**

८. वर्दीदार—लक्ष्मण (सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यामध्ये असे सांगितले की, घटना दिनांक २४.१२.२०२३ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० वाजताचे दरम्यान त्याच्या ऑफीससमोर गोरेगाव येथे घडली. घटनेदिवशी तो त्याच्या ऑफीससमोर रिक्षेतून उतरला असता त्याचा अपघात झाला. स्टेशनच्या बाजूने येणा—या एका बाईकने त्याला धडक दिली. धडकेमुळे त्याच्या उजव्या पायाला दुखापत झाली. त्याला लाईफलाईन रुग्णालयात घेवून गेले. त्याची सर्जरी झाली. त्यानंतर त्याने फिर्याद निशाणी ४ दिली. तो आरोपीला ओळखत नसल्याचे त्याने सांगितले.

Digitally signed by AMJADKHAN MEHABOOB MUJAWAR Date: 2025.07.16 14:58:11 +0530

९. आरोपीच्या विधीज्ञांनी वर्दीदाराचा उलटतपास घेतला. त्यामध्ये त्याने सांगितले की त्याने मोटारसायकल चालवणा—या इसमाला पाहिले नाही. त्याने

हे मान्य केले की त्याची आरोपीविरुद्ध कोणतीही तक्रार नाही. त्याने हे मान्य केले की त्याला सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही. त्याने असे सांगितले की त्याला इतर कोणताही साक्षीदार तपासायचा नाही. त्याने हे मान्य केले की त्याने गैरसमजुतीतून फिर्याद दिली होती.

१०. अभियोग पक्षाने प्रकरणात प्रथम वर्दी अहवाल सादर करुन तो पुरावा कायद्याप्रमाणे सिद्ध केला नाही. या प्रकरणात अभियोग पक्षाने केवळ वर्दीदाराला तपासले, परंतु तो अभियोग पक्षाला सहकार्य करत नाही. प्रस्तुत प्रकरणात वर्दीदाराला दुखापत झालेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल असले तरी अभियोग पक्षाने सदरची झालेली दुखापत ही आरोपीने दिलेल्या धडकेमुळे झाली आहे हे सिद्ध केलेले नाही. वर्दीदाराने त्याच्या उलटतपासात त्याने मोटारसायकल चालकास पाहिले नसल्याचे सांगितले. तसेच त्याने हे मान्य केले की त्याची आरोपीसोबत तडजोड झाली असून त्याची आरोपीविरुद्ध तक्रार नाही व त्याला सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही हे मान्य केले. त्याने त्याला अन्य कोणताही साक्षीदार तपासायचा नाही असे कथन केले. अशा परिस्थितीत, आरोपीनेच त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवून वर्दीदाराच्या मोटारसायकलला धडक दिली व वर्दीदाराला गंभीर जखमी केले, असे दर्शविणारा पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. म्हणून मुद्दे क्रमांक १ ते ३ ला नकारार्थी निर्णय नोंदवण्यात आले आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करिता :**

११. मुद्दे क्रमांक १ ते ३ वरील नकारार्थी निर्णयावरुन आरोपीवर लावण्यात आलेल्या आरोपांतून तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

Digitally signed by AMJADKHAN MEHABOOB MUJAWAR Date: 2025.07.16 14:58:16 +0530

## आदेश

१. आरोपी नामे ब्रिजेश रामदास चौधरी याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीनकदबे व जातमुचलके रद्द करण्यात येत आहेत. रोख जामीनाची रक्कम, असल्यास, त्याला तात्काळ परत करणेत यावी.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) नुसार रुपये १०,०००/— चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायपिठासनावरुन लिखित व घोषित करण्यात आला.)

Digitally signed by AMJADKHAN MEHABOOB MUJAWAR
Date: 2025.07.16 14:58:22 +0530

**(ए. एम. मुजावर)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
१७ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

स्थळ : बोरीवली
दिनांक : १६.०७.२०२५
निमोप्र.

टंकलिखित दिनांक : १६.०७.२०२५
स्वाक्षरी केलेला दिनांक : १६.०७.२०२५